(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महाराष्ट्रातील सशक्त व्यक्तिमत्व :लीलाताई पाटील

**सौ .वेदा उदयराज माळकर**. संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर.

---

**गोषवारा**

१९४७ ला भारत स्वतंत्र झाला. या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लाखो- करोडो, स्त्री- पुरुष व बालक बालके यांनी आपले प्राण दिले आहेत. २०२२ते २०२३ हे आपले भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष. स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेली ७७ वर्षे स्त्रियांच्या स्वातंत्र्य युद्धातील कामगिरीकडे सतत दुर्लक्ष झाले आहे. महिला नेत्यांची गुणगान अवश्य झाले. परंतु आपण एक गोष्ट विसरलो. आंदोलनाला कर्तबगार नेत्यांची आवश्यकता असते त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक बलिदान करायला निघालेल्या स्वयंसेवकांचे असते. म्हणूनच या महान नेत्यांबरोबर समाजातील सर्व थरातील महिलांनी कोणती कामगिरी केली हेही आपण पाहणे जरुरीचे आहे .यासाठी स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान पाहणे गरजेचे आहे .[१]

**Key words SSSS**

लीलाताईंचा जन्म, विवाह, शिक्षण, बंडखोर स्वभाव, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय कार्य

**उद्दिष्टे**

" मुंबई प्रांतातील स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान " या शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

१) लीलाताईंच्या देशभक्तीचा अभ्यास करणे .

२) लीलाताईंच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचा अभ्यास करणे.

३) लीलाताईंचे असीम साहस व बंडखोर स्वभावाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. यामध्ये लिलाताई पाटील यांच्या बद्दल लिखित पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, ऐतिहासिक घडामोडी व तत्कालीन संदर्भ साधनांचा अभ्यास केला आहे. या सर्व साधनांचे परीक्षण करून विश्लेषण केले आहे

**प्रस्तावना**

कोणताही इतिहास घडताना तो घडविण्यासाठी केवळ पुरुषांचेच हात कारणीभूत असतात असे नाही. तर बालपणापासून ते तारुण्यपर्यंत पुरुषांना घडविणारे मातेचे हात ,तिची माया ,तिने मुलांवर केलेले संस्कार त्यांच्यामध्ये निर्माण केलेला विश्वास इत्यादी अनेक घटनांमुळे कर्तबगार पुरुष निर्माण झाले आहेत. पण असे पुरुष निर्माण केलेल्या माता-भगिनींना, स्त्रियांना मात्र दुर्लक्षित केले जाते .असे मानले जाते की, प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते. तर स्त्रीवादी दृष्टिकोनातून इतिहासाचे पुनर्लेखन होणे आवश्यक वाटते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जी जन आंदोलने झाली त्या प्रत्येक टप्प्यात स्त्रियांनी प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष सहभाग घेतला. स्वातंत्र्य चळवळीत ज्या ज्या स्त्रियांचे योगदान लाभले त्यापैकी एक म्हणजे क्रांतिवीरांगणा लीलाताई उत्तमराव पाटील.

**जन्म**

सत्यशोधकी विचार मांडणारे आणि महात्मा फुलेंची विचारधारा स्वतः आचरणात आणणारे वामनराव पाटील यांच्या पोटी १५मार्च १९२२ साली नाशिक जिल्ह्यातील साकोरा या खेड्यात लीलाताईंचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण फारसे झाले नाही .परंतु श्रीमंत व सुखवस्तू मराठा कुटुंबात त्या जन्माला आल्यामुळे त्यांचे बालपण चांगले गेले.[२]

**विवाह**

वयाच्या सोळाव्या वर्षी धुळे येथील उत्तमराव पाटील यांच्याशी त्यांचा विवाह झाला. अत्यंत साध्या पद्धतीने झालेल्या या विवाहाला सर्व जाती धर्माचे लोक सहभोजनासाठी उपस्थित होते .१९३७ ला झालेल्या विवाह दरम्यानच्या घडामोडीमुळे लीलाताईंच्या आयुष्यात पुरोगामी सामाजिक विचारांचे बीजारोपण झाले. डॉ. उत्तमराव पाटील म्हणजे साने गुरुजींचा पट्टशिष्य व महात्मा गांधीजींच्या विचारांचा पाईक. लीला ताईंशी विवाह आणि हातात रिकामी पिशवी एवढीच इस्टेट असलेल्या या कफल्लक देशभक्त तरुणाशी लग्न सोहळ्यातील एकही पारंपारिक विधी न करता, जाड्याभरड्या खादीच्या साडीवर एका दलित बांधवांच्या पौरोहित्याने गळयात मंगळसूत्र न घालता पार पडला. खानदेशातील त्या पंचक्रोशीत अशा प्रकारच्या सत्यशोधकी विवाह समारंभ पहिल्यांदाच संपन्न झाला होता.[३]

**बंडखोर स्वभाव**

जळगाव जिल्ह्यातील डांगरी या गावातील सासरी गेल्यावर अठरा विश्व दारिद्र्य असलेल्या चंद्रमौळी झोपडीत संसार सुरू करताना त्यांच्या विवाहातील बंडखोरीमुळे भावकीतील नातलगाकडून सुरुवातीला सामाजिक बहिष्कार आला सामोरे जावे लागले . सख्या चुलत सासरची मंडळी त्यांना महाराच्या हातून लग्न लावून घेतले अशी हेटाळणी करीत .विहिरीवर पाणी सुद्धा भरून देत नसत . मात्र पती, दीर ,सासू यांच्या पुरोगामी भक्कम पाठबळामुळे त्यांनी या सर्व बाबीवर लीलया मात केली.

" डोईवरचा पदर आला खांद्यावरी ,
जाईन मी भरल्या बाजारी "

या संत जनाबाईंच्या ७०० वर्षांपूर्वीच्या लिहिलेल्या स्त्री सशक्ति करणाच्या ओवीनुसार लीलाताईंनी अत्यंत बाणेदारपणे व विनयतेने डोक्यावरचा पदर खांद्यावर घेत स्वतःचा संसार धार्मिक व सामाजिक रूढी बंधनांना टिच्चून समर्थपणे पेलला. त्याकाळी खानदेशी परिसरात स्त्रीने स्वतःच्या पायाचे नख सुद्धा बाहेर दिसू देणे म्हणजे सामाजिक निंदा-नालस्तीचा विषय असताना लीलाताईना काय जाच झाला असावा. याची आपण कल्पना करू शकतो. १९३७-३८ म्हणजे आज पासून ८५ वर्षांपूर्वीचे बंडखोरीचे हे चित्र आज आम्हा सर्वांना विस्मयचकित करणारे आहे.[४]

**संपूर्ण कुटुंब स्वातंत्र्य चळवळीत**

लीलाताई पाटील यांचे संपूर्ण कुटुंबच स्वातंत्र्य चळवळीसाठी बलिदानाच्या वेदीवर उभे असल्याचे आपल्याला दिसते. त्यांच्या वयोवृद्ध सासुबाई स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगात गेल्या .तेथेच त्यांची निधन झाले. दिरांनाही अटक झाली. पती डॉ. उत्तमराव पाटील यांचे भारत छोडो आंदोलनातील व प्रतिसरकार म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटलांचे पत्री सरकार चळवळीतील आंदोलन स्वातंत्र्यलढ्यात सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्याजोगे विलक्षण आहे .लीलाताईंचे दोन्ही धाकटे दीर शिवाजीराव पाटील व दशरथराव पाटील स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या त्यांच्या आंदोलनामुळे तुरुंगात होते . शिवाजीराव पाटील म्हणजे महाराष्ट्राचे माजी मंत्री व अभिनय सम्राज्ञी स्मिता पाटील यांचे पिता .[५]

तसेच लीलाताईंचे वडील वामनराव पाटील ,त्यांचे मामेसासरे कॅप्टन विश्वासराव पाटील ,सख्खे मामा गोविंदराव यांच्यासह त्यांच्या रक्ताच्या अनेक नातेवाईकांनी स्वातंत्र्यलढ्यात जीव धोक्यात घालून सक्रिय योगदान दिले. एकंदरीत लीला ताईंचे कुटुंबच स्वातंत्र सैनिकांची खाण होती. असे म्हटल्यास अजिबात वावगे ठरणार नाही एकाच कुटुंबाच्या उज्वल देशभक्तांचे असे दुसरे उदाहरण भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आढळत नाही.[६]

**लीलाताईंचे शिक्षण**

विवाहआधी फारसे शिक्षण न झालेल्या लीलाताईंनी डॉक्टर पतीच्या मार्गदर्शनातून नर्सिंग चा कोर्स पूर्ण केला. १९३९ ला अमळनेर येथे गोरगरिबांकरीता या उभयंताने दवाखाना सुरू केला. मात्र एक दोन वर्षातच त्यांना हा दवाखाना त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील व्यस्ततेमुळे आणि इंग्रजांच्या जाचामुळे बंद करावा लागला. मात्र त्यांनी खेडोपाडी दिलेल्या वैद्यकीय सेवेमुळे त्यांच्या भावकीतील व परिसरातील आप्त जनानी त्यांच्या कुटुंबावर घातलेला सामाजिक बहिष्कार नाहीसा झाला.

उत्तमराव पाटलांना कट्टर सामाजिक शत्रू मांडणाऱ्या चित्रमआप्पा या गावप्रमुखाची स्त्री तिच्या बाळंतपणात लीलाताईंनी स्वतःच्या वैद्यकीय कौशल्याने सोडवली .बाळासह त्या भगिनीला जीवदान दिले .तेव्हा चित्रम अप्पाने मनातील सर्व किल्मिषे दूर सारून लीलाताईंना त्याकाळी उच्च मानल्या जाणाऱ्या उत्चुच चौरंगावर बसवीत चांदीच्या थाळी व निरंजनाने ओवाळून सत्कार केला व स्वतःच्या द्वेषाची सांगता केली.[७]

**स्वातंत्र्य लढ्यातील योगदान/ सहभाग**

महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहातील सहभागामुळे दोघांनाही अटक झाली. धुळे येथील तुरुंगात ठेवण्यात आले. प्रभात फेरी ,ग्रामसफाई ,संडास सफाई, मजूर -शेतकरी संघटन ,इत्यादी सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभाग घेतला .अमळनेर येथील शासकीय इमारती, न्यायालय, पोस्ट ऑफिस ,रेल्वे स्टेशन जाळण्यामध्ये लिलाने पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व कार्यक्रम यशस्वी पार पडले.[८]

**१९४२ भारत छोडो आंदोलन**

१९४२ च्या ऑगस्टमध्ये गांधीजीनी सर्व देशवासीयांना दिलेली आंदोलनाची हाक शिरोदारह मानून पाच महिन्याच्या गर्भवती असलेल्या लीलाताईंनी या आंदोलनात उडी घेतली. त्यांनी ऑगस्ट१९४२ मध्ये पती उत्तमरावासह भारत छोडो या आंदोलनाची क्रांतीज्योत

"नही रखना, नही रखना ,
जालीम सरकार नही रखना"

अशा घोषणेने पेटवली . १५ऑगस्ट १९४२ ला लीलाताई उत्तमराव व इतर सहकाऱ्यांनी अमळनेर येथील न्यायालय, पोस्ट ऑफिस व स्टेशन या ब्रिटिशांच्या व मर्मस्थानावर मोर्चा काढून या इमारतींची राख रांगोळी केली. ब्रिटिश सरकारला हा मोठा धक्का होता. या आंदोलना दरम्यान शिपायांनी गोळीबार सुद्धा केला. इंग्रजांनी उत्तमराव यांच्याविरुद्ध या कारनाम्याकरिता डेथ वॉरंट काढल्याने १५ऑगस्ट च्या रात्रीतून ते भूमिगत झाले.[९]

**मार्शल लॉ चा भंग**

१६ऑगस्ट १९४२ला इंग्रजांनी लावलेला मार्शल लॉ तोडण्याच्या धारिष्ट्याचे लीलाताईंचे आंदोलन म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभागाचा परमोच्च क्षण होय. उत्तम रावांच्या गैरहजेरीत मात्र त्यांच्याच मार्गदर्शनाखाली लीलाताईंनी १६ ऑगस्टचे मार्शल लॉ भंगाचे आंदोलन दीर दशरथ पाटील व काही मैत्रिणींच्या साह्याने यशस्वी केले.

लीलाताई हातात तिरंगा झेंडा घेऊन या पाच-सहा तरुण आंदोलकांचे नेतृत्व करीत होत्या .त्यामुळे आदल्या दिवशीच्या जाळपोळीमुळे पित्त खवळलेल्या इंग्रज शिपायांनी या गटावर झडप घातली व अमानुष मारहाण केली.

"ऑगस्ट क्रांती जिंदाबाद,
इंग्रज राज मुर्दाबाद "

अशा घोषणा देत त्यांनी तिरंगा झेंडा आपल्या छाती व पोटाशी कवटाळला. तो ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी त्यांच्या पाठीवर दंड्याचे प्रहार केले. लीलाताई तिरंगा सोडत नाहीत .हे बघून क्रोधाने उद्विग्न झालेल्या शिपायांनी लीला ताईच्या कमरेवर, पोटावर रायफलच्या दस्त्याने अमानवीय कृरतेने वार केलेत .त्यांना फरफटत नेऊन तुरुंगात डांबले. या यामानुष मारहाणीत त्यांचा गर्भपात झाला .भारत मातेची सेवा करण्याच्या हट्टापायी या माऊलीचे मातृत्व इंग्रजांच्या जाचाने हिरावले गेले.[१०]

**१४ वर्षे तुरुंगवास**

अंमळनेर येथील शासकीय कार्यालयाची जाळपोळ या तत्कालीन शासनद्रोही गुन्ह्याकरिता साडेसहा वर्षे व मार्शल लॉ भंग या गुन्हा करता साडेसात वर्षे अशी एकूण १४ वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा त्यांना सुनावण्यात आली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात १४ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या लीलाताई या भारतातील पहिल्याच महिला असाव्यात .ऑगस्ट १९४२ पासून त्यांचा प्रवास धुळे तुरुंग -ठाणे तुरुंग- येरवडा तुरुंग असा झाला .[११]

इंग्रजांच्या हातावर तुरी

येरवडा तुरुंगात शिक्षा भोगत असताना कडक पहाऱ्याच्या या तुरुंगातून अंगामध्ये १०१ डिग्री ताप असताना लीलाताईंनी इंग्रज शिपायांच्या हातावर तुरी देत पलायन केले . त्यांना सोडवून आणण्याचा आदेश क्रांतिसिंह नाना पाटलांनी दिले .कारण उत्तमराव भूमिगत होऊन नाना पाटलांच्या गटात सहभागी झाले होते. प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी विजया लाड व शालूताई मिरगे यांची निवड करण्यात आली. ही सर्व जबाबदारी तुफानी सेनेचे प्रमुख जी.डी. लाड, बाबा मिरगे, सदा पवार इत्यादींच्या वर सोपवण्यात आली.[१२]

**तुफानी महिला सेनेचे नेतृत्व**

येरवडा तुरुंगातील पलायनानंतर लीलाताई सुद्धा भूमिगत होत क्रांतिसिंहाच्या चळवळीत पतीच्या खांद्याला खांदा भिडवत प्रतिसरकार चळवळीत तुफानी सेनेच्या महिला सैनिकांची सेनानी म्हणून नेतृत्व करू लागल्या .१९४६ पर्यंत उत्तमराव व लीलाताई यांच्या नावे असलेले सरकारी सर्च वॉरंट रद्द होईपर्यंत या जोडप्याने भूमिगत राहून महाराष्ट्रभर सामाजिक क्रांती पेटवत ठेवण्याचा प्रयत्न केला. नंतर हे सर्च वॉरंट रद्दबातल झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर या उभयंतांचे लोकसत्कार झाले.[१३]

स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक ,शैक्षणिक, राजकीय कार्य

स्वातंत्र्योत्तर काळात लीलाताईंनी स्त्री शिक्षण, स्त्रीमुक्ती ,सहकारी संघटना, स्त्री होमगार्ड दल इत्यादी सामाजिक कार्यात भरीव कार्य केले.१९४७ ला अमळनेर येथे जनता शिक्षण मंडळाची लीलाताईंनी मुहूर्तमेढ रोवून शेतकरी बोर्डिंग व ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. शिरपूर येथे वनिता सेवा मंडळ व कन्या विद्यामंदिर स्थापन करून त्यांनी मुलींच्या शिक्षणाचा व महिला सशक्तिकरणाचा प्रयोग राबविला. शिरपूर येथील नगर परिषदेच्या सलग नऊ वर्षे नगरसेविका होत्या .स्टॅंडिंग कमिटीच्या महिला चेअरमन होण्याचा महाराष्ट्रातील पहिल्या महिलेचा मान त्यांना मिळाला .१९७२ ते१९७६ या कालावधीत महाराष्ट्र विधानसभेच्या सिंदखेडा मतदारसंघाच्या जागरूक आमदार म्हणून लीलाताईंनी कार्य केले.[१४]

**निष्कर्ष**

लीलाताई पाटलांचे जीवन म्हणजे केवळ एका सत्याग्रही, भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांची कथा नसून एका संपूर्ण कुटुंबाच्या अद्वितीय त्यागाची गाथा आहे. अशा या साध्यासुध्या, मराठमोळ्या ,अंतर्यामी ,परक्यांच्या गुलामगिरीने व सामाजिक राजकीय अन्यायाने संतप्त होणारी त्यासाठी प्रथम सत्याग्रहाच्या व अंतिम सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने ब्रिटिशांशी प्राणपणाने लढणारी, प्राणभयाच्या संकटसमयीही न डगमगता बुद्धी शांत व स्थिर ठेवणारी, प्रसंगी मृत्यूला हे टाळणारी ऐन तारुण्यात पोटातल्या बाळावर व उभ्या संसारावर निखारा ठेवणारी, एक तेजस्वी क्रांती वीरांगणा लीलाताई उत्तमराव पाटील यांचे १मे १९८५ ला देहावसन झाले. या महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय उत्थानाकरिता त्यांनी सर्वस्वाचा त्याग केला. त्या महाराष्ट्रदिनीच त्यांच्या जीवन यज्ञाची सांगता व्हावी यापेक्षा दुसरा मोठा योगायोग असू शकत नाही. भारतीय जनतेला अन्यायाने छळणाऱ्या कॅन्सररूपी ब्रिटिश सत्तेला उलथवून टाकणाऱ्या या रणरागिणीचा अंत त्यांच्या शरीराला पोखरणाऱ्या कॅन्सरनेच झाला.

शतकानूशतके भारतात तसेच जगातील अन्य देशात स्त्रियांना गौण स्थान देण्यात आले .स्वातंत्र्य चळवळीत अनेक स्त्रियांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग घेतला .अनेक स्त्रियांनी स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात आहुती दिल्या. त्या बहुरंगी गर्दीत अनेक महिला अनामिका व बिन चेहऱ्याच्या राहिल्या. सुभाषचंद्र बोस म्हणतात," स्त्रियांच्या सक्रिय सहानुभूतीशिवाय आणि पाठिंबा याशिवाय पुरुषांना स्वातंत्र्य मिळविणे शक्य होणार नाही."

**संदर्भ ग्रंथ**

१) प्रधान ग. प्र., जाधव रा. ग.- निवडक साधना खंड ४-चळवळी व आंदोलने- वैद्य सत्यजित, साधना प्रेस ४३१ शनिवार पेठ पुणे ४११०३० पृ.११९

२) पुण्यनगरी- तेजस्वी क्रांतिवीरांगणा लीलाताई उत्तमराव पाटील- सचिन चौधरी -अमरावती, मंगळवार १५ मार्च २०१६

३) कित्ता

४) कित्ता

५) कित्ता

६ ) कित्ता

७) कित्ता

८) येडेकर श्याम -भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान महाराष्ट्र- राजहंस प्रिंटिंग प्रेस, नागाळा पार्क, कोल्हापूर. पृ.१८०-१८२

९) पुण्यनगरी- तेजस्वी क्रांतिवीरांगणा लीलाताई उत्तमराव पाटील- सचिन चौधरी -अमरावती, मंगळवार१५ मार्च २०१६

१०) कित्ता

११) कित्ता

१२) येडेकर श्याम -भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान महाराष्ट्र- राजहंस प्रिंटिंग प्रेस, नागाळा पार्क, कोल्हापूर. पृ.१८०-१८२

१३) पुण्यनगरी- तेजस्वी क्रांतिवीरांगणा लीलाताई उत्तमराव पाटील- सचिन चौधरी -अमरावती, मंगळवार१५ मार्च २०१६

१४) पुण्यनगरी-उपरोक्त,

15) **शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर- विसाव्या शतकातील भारतीय महिला- डॉ. नांदवडेकर ,व्ही. डी. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर .पृ३२

16) **डॉ. पाटील पद्मजा ,डॉ.जाधव शोभना भारतीय इतिहासातील स्त्रिया- फडके प्रकाशन, कोल्हापूर मार्च २००७